**नि.दि.दा.क्र.८८/२०१७**
**दत्तात्रय वि. मारुती व इतर**
**नि. क्र. ५० पुढे सुरु**

नि.क्र.८४ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु
**<u>प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस</u>**

२२. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त म्रुत्युपत्राची मुळ प्रत माझ्याकडे घरी उपलब्ध आहे. सदरचे मृत्यूपत्र दिनांक १६/५/२००८ रोजी केले होते. सदरील तारखेचे दिवशी मारूती रामचंद्र गार्डे यांचे शारिरीक व मानसिक आरोग्य सुदृढ असल्याचे दर्शविण्याकरीता वैद्यकिय प्रमाणपत्र सदरील मृत्यूपत्रासह जोडलेले नाही. साक्षीदार सांगतो की त्याअगोदरचे वैद्यकीय प्रमाणपत्र मृत्यूपत्रात जोडलेले आहे. तथापि मला ती तारीख सांगता येत नाही. त्यावर मारूती गार्डे यांची दिनांकित सही आहे. ते वैद्यकीय प्रमाणपत्र सातारा सीव्हील हॉस्पीटल तसेच वाई येथील बाबर हॉस्पीटल यांनी दिले आहे. त्या दोन्हीही वैद्यकीय प्रमाणपत्रावर मारूती गार्डे यांची दिनांकीत सही व अंगठा आहे. आता मला निशाणी क्र. ५७ सह दाखल मृत्यूपत्रासोबत असलेले दोन वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर कुठेही मारूती गार्डे यांची सही तसेच अंगठा नाही. माझ्या म्हणण्यानुसार, सदरचे दोन्हीही वैद्यकीय प्रमाणपत्रे मृत्यूपत्र तयार करण्याच्या पूर्वीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे वैद्यकीय प्रमाणपत्रे प्राप्त करण्याकरीता मारूती गार्डे स्वत: डॉक्टरांकडे गेले नव्हते आणि त्यामुळे त्यांची सही अथवा अंगठा त्यावर नाही. ज्या तारखेचे वादग्रस्त मृत्यूपत्र आहे त्या तारखेचे मारूती गार्डे यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता त्यांना कोणतीही अडचण नसल्याचे मला सांगता येणार नाही. सदरचे मृत्यूपत्र ज्यादिवशी तयार केले त्याच दिवशी दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदविले किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही. ते कधी नोंदविले याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत मी वैयक्तिक रीत्या तसेच साक्षीदारांकडून कोणतीही माहिती घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी वादग्रस्त मृत्यूपत्र वाचून पाहिले नसल्याने ते कधी नोंदवले याबाबत मला सांगता येत नाही.

२३. वादग्रस्त मृत्यूपत्रात नोंदविण्याकरीता माझे वडील दुय्यम निबंधक

कार्यालयात गेले होते. त्याची नोंदणी झाल्यानंतर माझ्या वडीलांनी ते रामदास मानसिंग शिंदे यांच्या ताब्यात दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, या सर्व घटनाक्रमाची माहिती माझ्या वडीलांनीच मला दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, रामदास मानसिंग शिंदे हा माझ्या वडीलांकडे शेतात गडी म्हणून कामाला होता. साक्षीदार पुन्हाहून सांगतो की रामदास शिंदे हा माझ्या वडीलांकडे शेतात गडी म्हणून कामाला कधीही नव्हता. मृत्यूपत्राच्या चार वर्षांनंतर माझ्या वडीलांनी त्याच्या नोंदणी बद्दल मला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की मृत्यूपत्र तयार करणे त्याकरीता स्टॅम्प पेपर खरेदी करणे, तो दस्त नोंदविणे याकरीता माझ्या वडीलांनी पुढाकार घेतला होता साक्षीदार पुन्हाहून सांगतो की, त्याकरीता माझे चुलते मारूती गार्डे यांनीच पुढाकार घेतला होता आणि त्यांना माझ्या वडीलांनी सोबत केली होती.

***प्रकरण उर्वरीत उलटतपासाकरीता तहकुब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

*स्वाक्षरी/-*

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- ०५/०२/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश, वाई.